दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
रायगड नगरी
मुख्य संपादक : सुनिल पोतदार
• वर्ष १५ वे • अंक १५९ • MAHMAR/2006/17212 • रायगड • गुरुवार दि.३ सप्टेंबर २०२० • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

पोलीस दलात मोठे फेरबदल ; नवी मुंबईच्या पोलीस आयुक्तपदी बिपीनकुमार सिंह

दै.रायगड नगरी । मुंबई

गणेशोत्सव पार पडताच राज्य सरकारकडून पोलिस दलात मोठे फेरबदल करण्यात आले आहेत. सरकारकडून ४०हून अधिक पोलिस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश जारी करण्यात आले आहेत. नाशिकचे पोलिस आयुक्त विश्वास नांगरे पाटील यांची पुन्हा मुंबईत बदली झाली आहे.

गेल्या अनेक दिवसांपासून महाराष्ट्र पोलिस दलात बदल करण्यात येणार असल्याची चर्चा होती. मात्र, गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पोलिस अधिकाऱ्यांच्या बदल्या करु नयेत अशी विनंती पोलीस महासंचालक सुबोध जयस्वाल यांनी घेतल्यानंतर अधिकाऱ्यांच्या बदल्या लांबणीवर पडल्या होत्या.

पोलिस आयुक्त विश्वास नांगरे पाटील यांची

मुंबईत बदली होणार याबाबत महिन्याभरापासून अनेक तर्क-वितर्क लढविले जात होते. अखेर आज मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची बदलीच्या आदेशावर स्वाक्षरी झाली. राज्य सरकारच्या आदेशानुसार, नाशिकचे पोलिस आयुक्त विश्वास नांगरे पाटील यांची मुंबईच्या कायदा व सुव्यवस्था या पदी नियुक्ती झाली आहे. तर, नांगरे पाटील यांच्या पदावर दीपक पांडे हे पदभार स्विकारणार आहेत. याशिवाय नाशिक परिमंडळचे विशेष महानिरीक्षक छेरिंग दोरजे यांची तुरुंग महानिरीक्षकपदी बदली झाली असून, प्रताप दिघावकर हे विशेष पोलिस महानिरीक्षक म्हणून पदभार स्वीकारणार आहेत. मिलिंद भारंबे यांची गुन्हे सहआयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली असून बिपीन कुमार सिंह यांची नवी मुंबईच्या पोलीस आयुक्तपदी बदली करण्यात आली आहे. कोल्हापूर परिक्षेत्राचे नवे विशेष पोलीस महानिरीक्षक म्हणून मनोजकुमार लोहिया यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पिंपरी- चिंचवडच्या पोलीस आयुक्तपदाचा पदभार कृष्णप्रकाश हे सांभाळणार आहेत. तर, अमरावतीच्या आयुक्तपदी नाशिकच्या अधीक्षक आरतीसिंह यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

धक्कादायक! महसूल अधिकारी कोणाच्या दावणीला देवेंद्र फडणवीस की उद्धव ठाकरे

दै.रायगड नगरी । पनवेल

रायगडातील जमिनी शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसून शासनाने संपादीत केल्या. रायगडात मोठमोठे प्रकल्प येवू घातले आहेत. त्यासाठी कॉरिडॉर प्रकल्प म्हणा अथवा दिघी पोर्ट म्हणा या उद्योगपतींच्या पायघड्या घालण्यासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी ताब्यात घेण्याचा घाट माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस अथवा विद्यमान मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी घातला नाही काय? असा सवाल रायगडातील शेतकऱ्यांकडून विचारला जात आहे.

महसूल विभागातील शासकीय खात्यातील सरकारी बाबू व त्यांचे वरिष्ठ अधिकारी कधी कुणाच्या जमिनीची वाट लावतील असा संपूर्ण महाराष्ट्रातील जनतेला अनुभव असल्यामुळे त्याची प्रचिती रायगड जिल्ह्यातील जनतेला देखील आलेली आहे. रायगड जिल्ह्यातील पुर्वाश्रमीचा माणगाव तालुका व नव्याने झालेला तळा तालुका या तालुक्यात कॉरिडॉर प्रकल्प येणार असे म्हटले जात आहे. कॉरिडॉर प्रकल्पा बरोबरच दिघी पोर्ट हा अदानीला आंदण दिल्यासारखं म्हणावं लागेल आणि त्यासाठी रायगड जिल्ह्यातील तळा तालुक्याच्या अविकसित भागातील रस्ते गेल्या ४० वर्षात जे चकाचक झाले नव्हते ते रस्ते काँक्रीटीकरण करण्याचे काम सुरू आहे. रस्ता काँक्रीटीकरण करण्याचा शासनाने जो निर्णय घेतला आहे तो स्वागतार्ह असून केवळ तो जनतेसाठी नसून अदानीसारख्या उद्योगपतींच्या घश्यात घालणाऱ्या दिघी पोर्टसारख्या उद्योगामुळेच हे घडत असल्याचा आरोप स्थानिक जनतेकडून केला जात आहे. त्यासाठी अनेक जमिनी भूसंपादन केल्याची सातबारा वर नोंद शासनाकडून केली जात आहे. प्रत्यक्षात चौकशी केली असता अशा प्रकारची कोणतीही नोंद केली नसल्याची माणगावच्या प्रांताधिकारी यांच्याकडून सांगण्यात येत आहे. परंतु शेतकऱ्यांच्या सातबारावर मग जमिन संपादनाची नोंद कशासाठी केली आणि ती कोणत्या प्रकल्पासाठी केली याचा उल्लेख विद्यमान सरकार अथवा ज्यांनी हे घडविले ते सरकार (पुर्वाश्रमीचे सरकार) का करू शकत नाहीत असा सवाल शेतकरी वर्गाकडून विचारला जात आहे. म्हणून स्वतःची पोळी भाजण्यासाठी पुर्वाश्रमीचे सरकार आणि विद्यमान सरकार हे शासकीय अधिकाऱ्यांना हाताशी धरुन हा खेळ करीत असल्याचा आरोप शेतकरी वर्गाकडून केला जात आहे. याचा खुलासा विद्यमान सरकारने तात्काळ करावा आणि शेतकऱ्यांच्या जमिनीवर लावलेला भूसंपादनाचा आदेश रद्द करावा अथवा शेतकऱ्यांना जमिन भूसंपादन करून त्याचा मोबदला तात्काळ द्यावा अशी मागणी तळा तालुक्यातील शेतकरी वर्गाकडून केली जात आहे.

महिलेच्या गळ्यातील दागिने लुटून चोरटा पसार

दै.रायगड नगरी । पनवेल

बाजारपेठेत खरेदीसाठी गेलेल्या एका महिलेच्या गळ्यातील सोन्याचे दागिने अज्ञात इसमाने लुटून पलायन केल्याची घटना पनवेल शहरात घडली आहे.

शहरातील कोळीवाडा भागात राहणाऱ्या ताराबाई कोळी (वय ६०) या बाजारात खरेदीसाठी गेल्या असता, टपालनाका परिसरात लाल रंगाचा रेनकोट आणि मास्क घालून आलेल्या अज्ञात व्यक्तीने त्यांच्या गळ्यावर हात टाकून त्यांच्या गळ्यातील सोन्याची बोरमाळ ओढली, त्यामुळे ताराबाई यांनी तात्काळ सदर लुटारूला पकडण्याचा प्रयत्न केला असता, त्याने ताराबाई यांच्या गळ्यातील अर्धवट तुटलेली सोन्याची बोरमाळ खेचून पलायन केले. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात केली आहे.

दैनिक रायगड नगरी ई-पेपर

दैनिक रायगड नगरी वृत्तपत्र डिजिटल स्वरुपात देखील सुरु झाले असून आता आपण www.raigadnagari.com या वेबसाईट वर जाऊन ई-पेपर वाचू शकता, तर वाट कसली पाहताय! पनवेल तसेच नवी मुंबई व रायगड जिल्ह्यातील महत्वपूर्ण बातम्यांसाठी आपण रोजच्या रोज भेट द्या आमच्या वेब साईट आणि त्यावरील ई-पेपरला!

७ सप्टेंबरला पेण अर्बन बँक संघर्ष समितीचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन

दै.रायगड नगरी । देवा पेरवी / प्रदीप मोकल

पेण को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक या सहकारी बँकेत १० वर्षांपूर्वी सुमारे ७५० कोटी रुपयांचा घोटाळा झाला होता. सदर बँकेतील सुमारे २ लाख ठेवीदारांना १० वर्षांच्या प्रदीर्घ लढ्यानंतर देखील आज तागायत न्यायालय न मिळाल्याने संतप्त झालेल्या ठेवीदारांनी सोमवार दिनांक ७ सप्टेंबर रोजी अलिबाग येथे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन करण्याचा पवित्रा घेतला आहे.

पेण को-ऑपरेटिव्ह बँकचे मुंबईत दादर, गिरगाव व विलेपार्ले असे ३ शाखा तर रायगड जिल्ह्यात १५

शाखा एकूण १८ शाखा होत्या. या बँकेत १ लाख ९८ हजार गोरगरीब ठेवीदारांचे कष्टाचे पैसे जमा होते. परंतु या बँकेत ७५० कोटी रुपयांचा घोटाळा होऊन ठेवीदारांचे कष्टाचे पैसे अडकले.

सुमारे १० वर्षांपूर्वी रिझर्व बँक ऑफ इंडियाने सदर बँकेवर निर्बंध लादली. त्यामुळे हा घोटाळा समोर आला. यावेळी संबंधित आरोपींवर पोलीस कारवाई सुद्धा करण्यात आली. बँकेच्या संचालक मंडळासह आरोपींनी जेलची हवा देखील खाल्ली होती.

पेण अर्बन बँक संघर्ष समितीने ठेवीदारांच्या पैसे मिळवण्याकरिता विविध प्रकारे आंदोलने, निदर्शने, उपोषणे केली. पेण ते मुंबई चालत लाँग मार्च काढला. रस्त्यावरील लढाईसह न्याय मिळण्याकरिता संघर्ष समिती मार्फत कोर्टातही दाद मागितली. उच्च न्यायालयाने ठेवीदारांच्या हिताचे आदेशही ..../२

जनतेच्या विविध मागण्यांसाठी ७ सप्टेंबर रोजी उरण तहसिलदार कार्यालयावर मोर्चा

दै.रायगड नगरी । उरण

कोरोना कोविड १९ च्या निमित्ताने जनतेला अनेक समस्यांनी ग्रासले आहे. त्याच्या निषेधार्थ उरण तहसील कार्यालयावर येत्या सोमवार दि.७ सप्टेंबर रोजी मोर्चाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती काँग्रेड संजय ठाकूर यांनी दिली.

लॉकडाऊनचा चार टप्पा सुरू झाला असला तरी जनतेच्या विविध समस्यांकडे शासनाचे दुर्लक्ष होत आहे. आजही कोरोनाचा संसर्ग कमी होताना दिसत नाही. त्यामुळे इतर आजारांचे दुर्लक्ष होत आहे, मुलांना मिळणारे विविध प्रकारचे डोस मिळण्याची प्रक्रिया थांबली आहे. उरणच्या मंजूर१०० खाटांचे हॉस्पिटलचे कामाला सुरुवात होत नाही. रास्तभाव दुकानातून तांदूळ, गहू, डाळ, कडधान्य, खाद्यतेल इत्यादी चिज वस्तूंची जनतेची मागणी आहे , मात्र सरकारी कोठारात पडून असलेला हा साठा उंदीर घुशी खातात परंतु जनतेला दिला जात नाही. रास्तभाव दुकानांत असणाऱ्या धान्यसाठ्याची माहिती लिहीली जाते नाही,धान्य खरेदीची पावती दिली जात नाही.धान्यवाटपात अनियमीतता असते.

वीज वितरण कंपनीच्या ढिसाळ कारभारामुळे सातत्याने वीज खंडीत होत आहे. यंदा निसर्ग चक्रीवादळाने व त्यानंतर ५ ऑगस्टच्या अतिवृष्टीमुळे मान्सुन ..../२

जासई येथील १३० पूरग्रस्तांना नुकसान भरपाई देण्याची सिडको व जेएनपीटी अधिकाऱ्यांची ग्वाही

दै.रायगड नगरी । जीवन केणी

उरण : मुसळधार पावसामुळे जासई गावातील १३० घरांच्या झालेल्या दैनिय अवस्थेची सविस्तर माहिती अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिली. भविष्यात आमच्या गावाला पावसाच्या पाण्याचा कशा प्रकारे धोका निर्माण होऊ शकतो. हे संघर्ष समितीचे अध्यक्ष सुरेश पाटील यांनी उरण तालुक्यातील छत्रपती शिवाजी हायस्कूल जासई येथे उपस्थित अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिले. तसेच १३० घरांची नुकसान भरपाई देण्याचे सिडको व जेएनपीटी अधिकाऱ्यांनी मान्य केले.

संघर्ष समितीचे अध्यक्ष सुरेश पाटील यांच्या बोलण्यात आणि जासई गावच्या ग्रामस्थांच्या बोलण्यात तथ्य असल्याची जाणीव झाल्याने उपस्थित सिडको आणि जेएनपीटीच्या अधिकारी वर्गाने त्वरित प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी

तयारी दर्शविली. लगेच अध्यक्ष सुरेश पाटील आणि संघर्ष समितीचे कार्यकर्ते यांनी जासई गावच्या पुर्व आणि पश्चिम बाजूची पाहाणी केली. त्यावेळी त्यांच्या निदर्शनास आले की, यासाठी ठिकाणी कायम स्वरूपी काँक्रिट नाल्यांची गरज असल्याचे निदर्शनास आणून दिले.

त्वरित सिडकोच्या व जेएनपीटीच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, एक - दोन दिवसात सिडकोच्या व्यवस्थापकीय संचालकां बरोबर संघर्ष समितीची बैठक आयोजित करून, या कामास प्रथम प्राधान्य देवून हे काम त्वरित सुरू करू,असे त्यांनी खात्रीपूर्वक ..../२

माणगावमध्ये जुगार अड्ड्यावर पोलिसांचा छापा

दै.रायगड नगरी । माणगाव

माणगांव पोलीस ठाणे हद्दीत मौजे चिंचवली ता. माणगांव येथे विनोद सुर्वे यांचे मालेकीचे बंद घरामध्ये अनाधिकृत जुगार अड्डा चालू असल्याची पोलीसांना बातमी मिळीली. या माहितीच्या आधारे मा. अपर पोलीस अधीक्षक सो. रायगड यांच्या आदेषान्वये सदरच्या जुगार अड्उयावर छापा टाकण्याकामी पोलीस निरीक्षक श्री. आर.एम.परदेषी नेमणूक नियंत्रण कक्ष, अतिरिक्त कार्य. पोलीस उप अधीक्षक (गृह) पोलीस अधीक्षक कार्यालय रायगड - अलिबाग, राखीव पोलीस उपनिरीक्षक श्री.षेख, पोह/१७५६ आर.व्ही.चाळके, पोह/२११४ आर.जी.मारकंडे यांना आदेषीत केल्यावरून वर नमूद ठिकाणी छापा टाकला असता सदर ठिकाणी बंद घरामध्ये काही इसम हे वेगवेगळे तीन पत्ती जुगाराचे डाव खेळत असल्याचे आढळल्याने पोलीसांनी त्यांना जागीच पकडले. या छापा कारवाई मध्ये एकूण २० आरोपीतांना सदर गुन्हयांचे कामी ताब्यात घेवून अटक करण्यात आली असून या आरोपीतांकडून त्याठिकाणी जुगार खेळण्याकरीता वापरण्यात आलेले साहित्यासह ०३,७६,३२०/- रू. एवढी रोख रक्कम तसेच १२ वाहने अषी एकूण ०५,७३,३२०/- रू.चा मुद्देमाल हस्तगत करून जप्त करण्यात पोलीसांना यष आले आहे. याबाबत आरोपींविरूध्द माणगांव पोलीस ठाणे या ठिकाणी गु.र.नं. १३७ /२०२० महाराष्ट्र जुगार प्रतिबंध कायदयाचे कलम ..../२

मोबाईल -सिम ऍक्टीवेट करण्याच्या बहाण्याने महिलेची फसवणूक

दै.रायगड नगरी । पनवेल

एअरटेल मोबाईल कंपनीचे सर्व जुने सिम कार्ड बंद होऊन नवीन ई-सिम ऍक्टीवेट होत असल्याचे सांगुन एका टोळीने खारघर मध्ये रहाणाऱ्या महिलेच्या एअरटेल सिमचे क्लोनिंग करुन त्याद्वारे त्यांच्या क्रेडीट कार्डमधून व त्यांच्या बँक खात्यातुन एकुण १ लाख ४६ हजाराची रक्कम परस्पर काढून घेऊन त्यांची फसवणुक केल्याचे उघडकिस आले आहे. खारघर पोलिसांनी या प्रकरणातील अज्ञात टोळी विरोधात फसवणुकीसह आयटी ऍक्ट नुसार गुन्हा दाखल केला आहे.फसवणूक झालेल्या महिलेचे नाव महालक्ष्मी असे आहे

खारघर सेक्टर- २ मध्ये राहणाऱ्या महालक्ष्मीकडे एअरटेल कंपनीचा मोबाईल नंबर असून त्यांचे बँक खाते, ईमेलवर त्यांचा एअरटेल कंपनीचा मोबाईल नंबर रजिस्टर्ड आहे. जुलै महिन्यात महालक्ष्मी याना एका अज्ञात व्यक्तीने एअरटेलच्या कस्टमर केअर मधुन बोलत असल्याचे सांगून एअरटेल कंपनीचे सर्व जुने सिम बंद होऊन त्याऐवजी नवीन ई-सिम ऍक्टीवेट होत असल्याचे व त्यामुळे चांगले नेटवर्क मिळणार असल्याचे त्यांना सांगितले. त्यासाठी ईमेल आयडीचे व्हेरीफीकेशन करण्यासाठी फोन केल्याचे सांगून त्यांना त्यांचा ईमेल आयडी सांगितला. समोरील व्यक्तीने ईमेल आयडी बरोबर सांगितल्याने महालक्ष्मी यांचा त्याच्यावर विश्वास बसला.त्यानंतर सदर व्यक्तीने महालक्ष्मी यांच्या मोबाईल फोनवर १२१ नंबरवरुन आलेल्या मेसेजमधील ओटीपी नंबर त्यांच्याकडून घेऊन, त्यांच्या ई-सिम ऍक्टीवेशनची प्रोसेस झाल्याचे व त्यांचा मोबाईल नंबर २४ तासात ऍक्टीवेट होणार असल्याचे तसेच त्यांचा फोन २४ तास बंद रहाणार असल्याचे सांगून फोन बंद केला. त्यानंतर दुसऱ्या दिवशी सायंकाळपर्यंत महालक्ष्मी यांचा फोन सुरु न झाल्याने त्यांनी एअरटेलच्या कस्टमर केअरवर संपर्क साधल्यानंतर त्यांच्यासोबत फसवणूक झाल्याचे व त्यांना आलेला कॉल हा फेक कॉल असल्याचे कस्टमर केअरमधील व्यक्तीने सांगितले. त्यानंतर महालक्ष्मी यांनी त्यांच्या बँकेचे युजरनेम व पासवर्ड टाकुन बॅलेन्स चेक केले असता, त्यांच्या बँकेचा पासवर्ड चुकीचा असल्याचे दाखविण्यात आले. यावेळी त्यांनी ईमेल तपासला असता, त्यांच्या क्रेडीट कार्डमधून १ लाख ३८ हजाराची रक्कम फोन-पे, एफ.एक्स मार्टवर गेल्याचे त्यांना ईमेल आल्याचे ..../२

इतिहासाचे सुवर्णपान

स्वातंत्र्यपूर्व काळातील राजकीय मूल्यव्यवस्था प्रमाण मानून स्वातंत्र्योत्तर भारताची जडणघडण करणारी जी दिग्गजांची पिढी तळपत राहिली, त्या पिढीतील लखलखते रत्न शोभावेत, अशा प्रणव मुखर्जी यांनी अखेरचा निरोप घेतला आहे. स्वातंत्र्यसैनिकाच्या पोटी जन्म झालेले, अस्सल बंगाली संस्कृती अंगी बाणलेले, कुशाग्र बुद्धीचे धनी आणि समन्वयाच्या राजकारणावर भर असणारे प्रणव मुखर्जी हे खऱ्या अर्थाने काँग्रेसमधील 'इंदिरायुगा'चे अपत्य होते. प्रणव मुखर्जी यांचा काँग्रेस पक्षातील उदय व विकास आणि पश्चिम बंगालमधील कम्युनिस्टांचा वाढता वरचष्मा हे प्रवाह इतके समांतर होते की, प्रणवदा हे कधीही बंगालचे लोकनेते बनू शकले नाहीत. सिद्धार्थशंकर राय यांच्याप्रमाणे काँग्रेसला जिंकविणे तर दूरच. अशावेळी, केंद्रीय पक्षवर्तुळात स्थान मिळवायचे तर बुद्धी, निष्ठा, वादपटुत्व आणि अर्थविचार हीच शस्त्रे आहेत, हे प्रणवदांनी फार लवकर ओळखले. प्रणवदांच्या पिढीच्या सुदैवाने काँग्रेसमध्ये आधी १९६९ मध्ये आणि नंतर १९७७ मध्ये अशी दोनदा मोठी फूट पडली. या दोन्हीवेळा इंदिरा गांधी यांच्यामागे उभे राहणारे आणि तरीही गुणी, सक्षम असे मोजकेच नेते होते. यात नरसिंह राव यांच्याप्रमाणे प्रणवदाही होते. चीनयुद्धातील पराभवाचा ठपका बसलेल्या व्ही. के. कृष्ण मेनन यांना इंदिरा गांधी यांनी खड्यासारखे दूर ठेवले. पण हे मेनन १९६७मध्ये बंगालच्या मिदनापूरमध्ये लोकसभेच्या पोटनिवडणुकीत 'बांग्ला काँग्रेस'चे उमेदवार म्हणून जिंकले. तेव्हा मेनन यांचे निवडणूक व्यवस्थापक होते, प्रणवदा. १९६९ मध्ये काँग्रेस फुटण्यापूर्वीच अतुल्य घोष यांच्या विरोधात डावीकडे झुकलेल्या सिद्धार्थशंकर राय, प्रणव मुखर्जी, एबीए घनीखान चौधरी यांनी अजय मुखर्जी यांच्या नेतृत्वाखाली 'बांग्ला काँग्रेस' स्थापली होती. हा पक्ष पुढे काँग्रेसमध्ये विलीन झाला, पण त्याआधीच प्रणवदांना इंदिराजींनी काँग्रेसमध्ये आणले होते. इतकेच नाही तर त्यांना राज्यसभेची उमेदवारी दिली. आणीबाणीच्या आधी १९७३ मध्ये मंत्रिमंडळात प्रणवदा उद्योग खात्याचे उपमंत्री झाले. ही त्यांच्या राजधानीतील प्रदीर्घ कारकिर्दीची खरी सुरुवात होती. या तरुण मंत्र्याचे आकलन तर उत्तम आहेच, पण त्याची चहुबाजूंनी विचार करण्याची क्षमता, कायद्याचे ज्ञान, निर्दोष मसुदे बनविण्याचे तंत्र आणि कोणतीही समस्या वेगाने सोडविण्याची हातोटी विलक्षण आहे, हे इंदिरा गांधी यांच्या लक्षात आले. अवघ्या सात वर्षांत १९८०मध्ये प्रणवदा पक्षाचे राज्यसभेतील नेते बनले. हा झपाटा इथेच थांबला नाही. त्याच मंत्रिमंडळात ते स्वातंत्र्यानंतरचे सर्वांत तरुण अर्थमंत्री बनले. कम्युनिस्ट नसणारी पण डाव्या आर्थिक विचारांची कास धरणारी चंद्रशेखर, रामधन, मोहन धारिया अशी 'तरुण तुर्कां'ची पिढी इंदिरा गांधी यांच्यावर आणीबाणीच्या आधी नाराज झाली होती. तेव्हाही, आपले डावे विचार आणि इंदिरा गांधी यांच्यावरील निष्ठा यांची एकरूपता प्रणवदांनी जपली. १९८० नंतर पंतप्रधान इंदिरा गांधी राजधानीत नसतील तर प्रणवदांनी मंत्रिमंडळाच्या बैठकीचे संचालन करावे, इथवर त्यांचा प्रवास झाला. तोही अतिशय झपाट्याने. प्रणवदा हे खंदे वाचक, उत्तम अध्यापक होतेच; पण कार्यकर्त्यांच्या गराड्यात रमून गॉसिपगप्पा कुटण्याचा त्यांचा स्वभाव नव्हता. एखादे गंभीर प्रकरण समजावून घेताना कुणी वायफळ बोलू लागला तर प्रणवदांच्या रागाचा पारा चढू लागे. त्यांच्या या शीघ्रकोपी स्वभावाचे किस्से त्या काळात इंदिराजींच्याही कानावर जात. प्रणवदांच्या या कोपाचा फटका कधी संसदेत तर कधी मुलाखतींमध्ये अनेकांना बसत आला आहे. मात्र, त्यांच्या स्वभावात तिरस्कार किंवा द्वेषाचा लवलेशही नसे. चकमक उडालेल्या खासदारांसोबत संसदेच्या कँटीनमध्ये रसगुल्ला खाण्यात रमणारे प्रणवदा हे एक वेगळेच प्रसन्न रूप असे. आपण या देशाचे नेतृत्व करू शकतो, याची चाहूल प्रणवदांना इंदिरापर्वातच लागली. पण नियतीने ही संधी त्यांना लागोपाठ तीनदा नाकारली. प्रणवदा अर्थमंत्री असताना रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर असणाऱ्या डॉ. मनमोहन सिंग यांच्या मंत्रिमंडळात त्यांना मंत्री व्हावे लागले. पण तेच डॉ. सिंग पंतप्रधान असताना राष्ट्रपती झालेल्या प्रणवदांनी राजकीय कारकिर्दीचा समारोप जेत्याला साजेसा केला. काँग्रेसमधल्या 'मायक्रो मॅनेजमेंट'चे प्रणवदा हे अध्वर्यू होते. एखादे राज्य त्यांच्याकडे सोपविले की, त्यांना एखाद्या तालुक्याच्या गावातही काय व कोण चालू आहे, याची खडानखडा माहिती असे. नरसिंह रावांची पाच आणि नंतर डॉ. सिंग यांची दहा वर्षे हा उदारीकरणाचा झंझावाती काळ असूनही प्रणवदांनी डावे आर्थिक विचार पुरते सोडले नाहीत. यातून काहीवेळा संघर्षाचे क्षणही आले. मात्र, साऱ्या समाजाची चिंता वाहणाऱ्या 'कल्याणकारी राज्या'चा त्यांचा आग्रह शेवटपर्यंत कायम होता. मोदी सरकारला सल्ला देतानाही तो तसाच राहिला. प्रणवदांनी आत्मकथेत फार सविस्तर लिहिले नसले तरी गांधी कुटुंबाशी त्यांचे नाते इंदिरापर्वानंतर कायम अस्थिर राहिले. असे असताना व काही काळ पक्षाशी दुरावल्यानंतरही पुन्हा पक्ष आणि सरकारमध्ये स्वत:चे अनन्य स्थान निर्माण करणे, हे सोपे नव्हते. डॉ. सिंग यांच्या काळात तर कोणत्याही समस्येवर मंत्रिगट स्थापला की, त्याचे नेतृत्व प्रणवदांकडे हे ठरूनच गेले होते. काँग्रेसच्या राजकीय शैलीत कुणाशीही संवाद न तोडणे आणि भविष्यावर नजर ठेवून विविध क्षेत्रांमध्ये भल्याबुऱ्या मित्रांची पेरणी करत राहणे, ही मोठी वैशिष्ट्ये आहेत. प्रणवदांमध्ये ती ओतप्रोत होती. काँग्रेसने देशाला अनेक राष्ट्रपती दिले. त्यातल्या काहींनी पक्षीय चौकट ओलांडून या पदाची प्रतिष्ठा जपली आणि वाढवली. प्रणव मुखर्जी हे या मांदियाळीतील होते. रोज नित्यनियमाने डायरी लिहिणारे प्रणवदा हे स्वत:च भारताच्या स्वातंत्र्योत्तर इतिहासातील एक सुवर्णपान होते. हे पान आता गळून पडले आहे!

मुरूड तालुक्यातील अनंत चतुर्दशीच्या गणपती बाप्पांचे विसर्जन मोठ्या भक्तिमय वातावरणात संपन्न

दै.रायगड नगरी । गणेश चोडणेकर

आगरदांडा : पायी हळु हळु चाला । मुखाने गजानन बोला ।। अशा जयघोष नामस्मरणात अनंत चतुर्दशीच्या गणरायांना भक्तिमय वातावरणात व थाटामाटात निरोप देण्यात आला.

कोरानाचा पादुर्भाव वाढु नये त्याकरिता मिरवणुक , फटाके फोडु नये आसा आदेश असल्यामुळे गणेशभक्तांनी आपले घरगुती गणपती टेम्पो,रिक्षा मधुन घेवुन नेण्यासाठी लगबग दिसुन येत होती.

कोरोनाचे संकट दूर कर सर्वांना सुखी ठेव अशी गणरायाकडे पार्थना यावेळी करण्यात आली. प्रशासनाचे नियमाचे पालन करत मुरूड शहरातील गणेशभक्तांनी समुद्रकिनारी तर पंचक्रशोतील भागातील गणेशभक्तांनी जवळ असलेल्या शिघ्रे नदी या ठिकाणी अनंत चतुर्दशी दिवसाच्या गणपती बाप्पा विसर्जन कोरोना संकटावर मात करत व सोशल डिस्टनचा पालन करत भक्तिमय वातावरणात बाप्पांना निरोप देण्यात आला.

गणपती म्हणजे महाराष्ट्राचं लाडकं दैवत. वर्षभर आपण बाप्पांची केवढ्या आतुरतेनं वाट पाहत असतो ना! बाप्पांच्या आगमनाची तयारी अगदी महिनाभर आधीपासून घराघरांत सुरू झालेली असते. बाप्पासाठी मखर, फुलांची आरास, नैवेद्य सारी लगबग असते. आज निरोप देताना गणेशभक्त भावूक होत असतात.

मुरूड पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक – रंगराव पवार यांच्या नेतृत्वखाली मुरूड पोलीस ठाणे हद्दीतील विसर्जन स्थळावर चांगला बंदोबस्त ठेवण्यात आला होता. सहाय्यक पोलीस निरीक्षक– रंगराव पवार यांनी पोलीस ठाणे हद्दीतील गणेशभक्तांना विसर्जन करण्याकरिता घराबाहेर पडताना तोंडाला मास्क लावुन व सोशल डिस्टनचा वापर करा या करिता आपल्या गाडीतुन ऑलसिंग करून आवाहान करत होते. त्या आवाहानला गणेशभक्तानी चांगला प्रतिसाद देवुन नियमाचे पालन करून आपल्या लाडक्या बापाला निरोप देण्यात आला.

ह.भ.प. नथुराम पाटील यांचे ९४ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन

दै.रायगड नगरी । पेण

रायगड जिल्ह्याची आयोध्या म्हणून ओळख असणाऱ्या पेण तालुक्यातील बळवली गावातील ह.भ.प. नथुराम तुकाराम पाटील उर्फ नथुबुवा यांचे आज वयाच्या ९४ व्या वर्षी वृद्धपकाळाने निधन झाले. नथुबुवा हे भजनसम्राट होते. त्यांनी प्रवचन, कीर्तन, भजन, भारुड, हरिपाठ गायले आहेत. रायगड जिल्ह्यात होणाऱ्या भजन स्पर्धेत सहभाग घेऊन श्री राम भजन मंडळास अनेक प्रथम क्रमांक मिळवून दिले आहेत. तसेच पंढरपूर व आळंदी येथील धर्मशाळा निर्माण कार्यात सक्रिय सहभागी असायचा. १९७५ ते १९९० सालापर्यंत त्यांनी पोलीस पाटील म्हणून सेवा केली आहे. नथुराम तुकाराम पाटील हे पेण तालुका जेष्ठ नागरिक संघाचे सक्रिय सदस्य होते. तर पेण तालुका मराठी साहित्य कला मंचच्या माध्यमातून त्यांनी काम केले आहे. संस्कार, व्यसनमुक्ती, अंधश्रद्धा निर्मूलन कार्यात ही ते सक्रिय होते.

उरणमधील प्रसिद्ध कबड्डीपट्टू आश्विन पाटील याचे दु:खद निधन

दै.रायगड नगरी । उरण

उरण तालुक्यातील भेंडखळ गावचा सुप्रसिद्ध कबड्डीपट्टू अश्विन रमेश पाटील (२८) याचे काल दु:खद निधन झाले आहे. यामुळे उरण परिसरात हळहळ व्यक्त केले जात आहे. यामुळे जिल्हा उत्कृष्ठ चढाई पट्टूला मुकली आहे.अश्विनला पहिल्यापासून कबड्डी खेळाची आवड होती. अल्पावधीतच कबड्डीत रायगड जिल्ह्यात उत्कृष्ठ चढाईपट्टू म्हणून त्याची ओळख निर्माण झाली होती. त्याला काही दिवसांपूर्वी कोरोना या विषाणूची बाधा झाली होती.

त्याच्यावर डीवाय पाटील हॉस्पिटलमध्ये गेले १४ दिवसापासून उपचार सुरू होते. त्याच्या प्रकृतीत सुधारणा होत होती. परंतु काल रात्री अचानक प्रकृती बिघडल्याने त्याचे आज सकाळी निधन झाले आहे. त्याच्या अचानक जाण्याने सर्व कबड्डी प्रेमी तसेच उरण तालुक्यात हळहळ व्यक्त केले जात आहे. अश्विनच्या निधनाची वार्ता समजतात भेंडखळ गावासह उरण शहरासह इतर गावात दु:खाचे सावट पसरले आहे. अश्विनच्या पश्चात पत्नी, दोन लहान मुले, वडील, भाऊ, बहीण असा परिवार आहे.

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री.वाळकू गोटीराम दरे व इतर रा.मु.नितळस, ता.पनवेल, जि.रायगड यांचे मालकीची, ताबे–कब्जेतील, वहिवाटीतील शेतजमीन मिळकत, जीचे तपशिलवार वर्णन खालीलप्रमाणे

मिळकतीचे वर्णन

मौजे : नितळस, ता.पनवेल, जि.रायगड येथील...

मौजे	भूमापन क्र.	उपविभाग	क्षेत्र हे.आर.प्र.	आकार
मौजे : नितळस, पनवेल–रायगड	१६३	२	०–४१–७०	रु.७.४४ पै

वर नमूद केलेली शेतजमीन मिळकत ही आमचे अशिलांनी श्रीमती.आशादेवी शिवबहादूर यादव, रा.बी.१०५, एवरेस्ट अपार्टमेंट, प्लॉट नं.१, सेंट जोसेफ स्कूल जवळ, कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड–४१०२१८ यांस विक्री करण्याचे ठरविले होते. परंतु श्रीमती.आशादेवी शिवबहादूर यादव यांनी ठरलेल्या अटी व शर्तीची पुर्तता केली नसल्याने, सदरचा व्यवहार पूर्ण झालेला नाही, सबब आमचे अशिलांनी व्यवहार रद्द करण्याचे ठरविले आहे.

सबब या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, व्यवहार पूर्ण झाला नसल्याने अद्याप विषयांकित मिळकतीचे कायदेशीर मालक म्हणून आमचे अशिल हेच आहेत आणि वर नमूद केलेल्या श्रीमती. आशादेवी शिवबहादूर यादव या स्वतः सदरहू मिळकतीच्या तथाकथित मालक म्हणून घोषित करून अन्य इसमांस सदरहू वादग्रस्त मिळकत विक्री करण्याच्या बेतात आहेत आणि तसे झाल्यास संबंधित इसमांचे कधीही भरुन न येणारे नुकसान होईल आणि आमचे अशिल श्री.वाळकू गोटीराम दरे व इतर यांचे संमतीशिवाय केलेला व्यवहार आमचे अशिलांवर बंधनकारक नसेल, तरी वर नमूद केलेल्या इसमांबरोबर कोणीही कोणत्याही प्रकारचा व्यवहार करू नये अथवा करण्याचा प्रयत्न करू नये, तसे काही केल्यास त्यावर माझे अशिलांची हरकत असेल, येणेप्रमाणे हरकत नोटीस असे.

ठिकाण : पनवेल

दिनांक : २/९/२०२०

सही/–
ॲड.निवृत्ती बा.पावशे,
ॲडव्होकेट–हायकोर्ट
शॉप नं.४९, पहिला मजला, बिल्डींग नं.३, पनवेल महानगरपालिका कॉम्प्लेक्स, पनवेल, जि.रायगड
मो.नं.९८७००८८५९८

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमीन मिळकत ही सदर मिळकतीचे मुळ मालक श्री.दत्तात्रेय सिताराम शिंदे, वेणुबाई बाळाराम सासे, रेश्मा रवींद्र ठोंबरे, मधुकर सिताराम शिंदे यांच्याकडून कायमस्वरुपी खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आाहे. सदर जमीन मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :–

मिळकतीचे वर्णन

मौजे : भोकरपाडा, ता.पनवेल, जि.रायगड

गट क्र./ उपविभाग	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार रु.पै.	मालकाचे नाव
११४	०–४६–५० पो.ख.०–०४–८०	१०.३७	श्री.दत्तात्रेय सिताराम शिंदे, वेणुबाई बाळाराम सासे, रेश्मा रवींद्र ठोंबरे, मधुकर सिताराम शिंदे

वरील वर्णन केलेली मिळकत अथवा तिच्या कोणत्याही भागावर यापूर्वी विक्री, देणगी, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ इत्यादी कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसाच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहीत खाली सही करणारे यांचेकडे त्यांच्या खाली दिलेल्या पत्यावर पोहोचवावी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आम्ही सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करू व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचेवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल

दि.०२/०९/२०२०

सही/–
ॲड.सागर का.कोंडीलकर
ऑफिस नं.२, जनता विद्यालय मोहोपाडा, ता.खालापूर, जि.रायगड
मो.नं.८७९६८७७३६९

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खाली नमुद केलेल्या जमिन मिळकतीचे मालक यांनी सदर मिळकत आमचे आशिलांस विकणेसंदर्भात त्यांचे बरोबर वाटाघाटी केलेल्या आहेत. तरी खाली नमुद केलेल्या मिळकती संदंर्भात कोणाचाही दान, गहाण, बक्षीस, फरोक्त,साठेकरार,लिएन चार्जेस, अटॅचमेंट, अन्न, वस्त्र, निवारा, कुळवहीवाट, ताबा, कबजा, वहीवाट, वचनचिठ्ठी, दावा, दरखास्त,जप्ती, संपादन, रेक्वीझेशन, अगर अन्य प्रकारचा कसलाही,कोणताही हक्क, हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिदध झालेच्या दिनांकापासुन २१ दिवसांचे आत खालील सहया करणार वकिल यांजकडे लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह दाखल कराव्यात, तशा प्रकारच्या हरकती दाखल न केल्या गेल्यास सदरची मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याचे गृहीत धरून व मागाहुन आलेल्या हरकती जाणिवपूर्वक सोडुन दिल्या आहेत असे गृहीत धरून आमचे आशिल सदरहु मिळकती खरेदी करतील व मागाहुन येणाऱ्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची नोंद घ्यावी. मिळकतीचे वर्णन :–

मौजे : नेरे, तालुका : सुधागड, जिल्हा : रायगड

सर्व्हे नंबर	हिस्सा नं	क्षेत्र हे.आर	भोगवटादाराचे नाव	आकार रु.पै.
७५	१	५–७०–० पो.ख १–०६–० ६–७६–०	आनंद रामचंद्र नाईक	५=८१

सही/–
पत्रव्यवहाराचा पत्ता :
ॲड.किरण सदानंद घरत
पत्ता : शॉप नं.१, हेमकुंज बिल्डींग, प्लॉट नंबर २२, सेक्टर ८, खांदा कॉलनी, पनवेल
मोबाईल नं. ९९८७३७९६९५

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खाली नमुद केलेल्या जमिन मिळकतीचे मालक यांनी सदर मिळकत आमचे आशिलांस विकणेसंदर्भात त्यांचे बरोबर वाटाघाटी केलेल्या आहेत. तरी खाली नमुद केलेल्या मिळकती संदंर्भात कोणाचाही दान, गहाण, बक्षीस, फरोक्त,साठेकरार,लिएन चार्जेस, अटॅचमेंट, अन्न, वस्त्र, निवारा, कुळवहीवाट, ताबा, कबजा, वहीवाट, वचनचिठ्ठी, दावा, दरखास्त,जप्ती, संपादन, रेक्वीझेशन, अगर अन्य प्रकारचा कसलाही,कोणताही हक्क, हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिदध झालेच्या दिनांकापासुन २१ दिवसांचे आत खालील सहया करणार वकिल यांजकडे लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह दाखल कराव्यात, तशा प्रकारच्या हरकती दाखल न केल्या गेल्यास सदरची मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याचे गृहीत धरून व मागाहुन आलेल्या हरकती जाणिवपूर्वक सोडुन दिल्या आहेत असे गृहीत धरून आमचे आशिल सदरहु मिळकती खरेदी करतील व मागाहुन येणाऱ्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची नोंद घ्यावी. मिळकतीचे वर्णन :–

मौजे : नेरे, तालुका : सुधागड, जिल्हा : रायगड

सर्व्हे नंबर	हिस्सा नंबर	क्षेत्र हे.आर	भोगवटादाराचे नाव	आकार रु.पै.
७५	२ ब	१–८३–०	श्री.नितीन रामचंद्र गावंड	२=२५

सही/–
पत्रव्यवहाराचा पत्ता :
ॲड.किरण सदानंद घरत
पत्ता : शॉप नं.१, हेमकुंज बिल्डींग, प्लॉट नंबर २२, सेक्टर ८, खांदा कॉलनी, पनवेल
मोबाईल नं. ९९८७३७९६९५

पृष्ठ क्र.१ वरुन...

जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन

पारित केले. त्यानुसार जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली उच्चपदस्थ अधिकारी, तपास अधिकारी व ठेवीदार प्रतिनिधी यांची विशेष कृती समिती गठित करण्यात आली. या समितीचे मुख्य कार्य ५९८ कोटी ७२ लाख रुपयांची वसुली व बड्या कर्जदारांवर कारवाई करणे त्याचप्रमाणे बँकेच्या पैशाने विकत घेतलेल्या मालमत्ता ताब्यात घेणे हे होते. परंतु प्रत्यक्षात मात्र आजतागायत ५९८ कोटी ७२ लाख रुपयां पैकी केवळ ५ कोटींची वसुली करण्यात आली आहे. अनेक वेळा तर या विशेष कृती समितीची बैठकही वेळेवर होत नाही. यामुळे ठेवीदारांना मध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे. अखेर या ठेवीदारांनी धरणे आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे. या आंदोलना दरम्यान सोशल डिस्टंसिंग व कोविड – १९ चे नियम पाळण्यात येणार आहेत

अर्बन बँक घोटाळ्यातील आरोपींच्या मालमत्तेचे कोणतेही व्यवहार न करण्याचे आदेश असताना देखील अनेक आरोपींच्या मालमत्तेचे व्यवहार होत आहेत त्याच प्रमाणे अर्बन बँक घोटाळ्यातील आरोपींनी मागील १० वर्षात सत्तेतील पक्षांमध्ये प्रवेश करून स्वत:वरील कारवाई टाळण्याचा प्रयत्न केला. राजकीय पक्षांच्या नेत्यांनी राजकारण न करता ठेवीदारांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून या आरोपींवर कठोर कारवाई करण्याचीमागणी पेण अर्बन बँक ठेवीदार संघर्ष समितीचे कार्याध्यक्ष नरेन जाधव यांनी केली आहे.

उरण तहसिलदार कार्यालयावर मोर्चा

पूर्व काम न झाल्याने पोल पडणे, लाईन तुटणे भूमिगत वीज वाहिन्या नादुरुस्तीचा त्रास वीज ग्राहकांना सहन करावा लागत आहे. त्यामुळे टीव्ही,फ्रीज, लॅपटॉप,काम्प्युटर ,इस्त्री वगैरे सारख्या वस्तू नादुरुस्त होत आहेत. नव्याने सबस्टेशन बनवणार आहोत ही कॅसेट गेली दहा वर्षे लोक ऐकत आहेत. मात्र त्यात सुधारणा नाही, त्यातच १एप्रिल २०२०पासून वीजदर वाढीचा फटका सर्व वीज ग्राहकांना बसला आहे. जनतेला आर्थिक भुर्दंड बसत आहे.

ग्रामिण भागातील एसटीची बस सुविधा आज ही बंद आहे.त्यामुळे प्रवाशांचे हाल होत आहेत. नागरिकांना खड्ड्यांतून प्रवास करण्यास सार्वजनिक बांधकाम विभाग,सिडको, जेएनपीटी, नॅशनल हायवे अथॉरिटीने भाग पाडले आहे. लॉक डाऊनचे निमित्त करून एकाही अस्थापनेने काम केले नाही,खड्डे भरले नाहीत. आजही प्रवासात हाडे खिळखिळी होऊन अपघात होत आहेत. एकूणच कोविड१९च्या निमित्ताने जनतेला वेठीस धरले आहे. याच्या निषेधार्थ उरण तहसिलदार कार्यालयावर मोर्चा आयोजित केला आहे.

या मोर्चाचे नेतृत्व सीटूचे राज्य सेक्रेटरी कॉम्रेड भूषण पाटील व जिल्हा अध्यक्ष कॉम्रेड मधूसुदन म्हात्रे, जनवादी महिला संघटनेच्या अध्यक्षा ज्योती म्हात्रें व सेक्रेटरी अमिता ठाकूर,डिवायएफआयचे अध्यक्ष दिनेश म्हात्रे, सेक्रेटरी राकेश म्हात्रे तर अ.भा. किसान सभेचे अध्यक्ष कॉम्रेड रामचंद्र म्हात्रे व सेक्रेटरी कॉम्रेड संजय ठाकूर करणार आहेत. तरी या मोर्चात मोठ्या संख्येने उरणच्या जनतेने सहभागी व्हावे असे आवाहन त्यांनी केले आहे.

सिडको व जेएनपीटी अधिकाऱ्यांची ग्वाही

संघर्ष समितीचे अध्यक्ष सुरेश पाटील आणि कमिटीच्या कार्यकर्त्यांना सांगितले. मात्र हे सारे गावकऱ्यांच्या एकीमुळे शक्य झाल्याचे स्पष्ट झाले आहे.

याबैठकीसाठी सिडकोचे अधिकारी सहाय्यक अभियंता एम.पी.पुजारी, कार्यकारी अभियंता भगवा साळवे,सहा.कार्यकारी अभियंता सुहास मांगले, सहा.कार्यकारी अभियंता विजय राऊत आणि चेतन बुध स.कार्यकारी अभियंता चेतन बुध तसेच जेएनपीटीचे अधिकारी डेपोटी.मॅनेजर राजेश म्हात्रे, जासई ग्रामपंचायतीचे सरपंच संतोष घरत, मा.सभापती नरेश घरत, प.सदस्य धीरज घरत, सुनिल घरत, मेघा म्हात्रे, सुभाष घरत, नामदेव पाटील व ह.भ.प.धर्मदास म्हात्रे हे कमिटीचे कार्यकर्ते आणि गावकरी अधिक संख्येने उपस्थित होते.

माणगावमध्ये जुगार अड्ड्यावर पोलिसांचा छापा

४,५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि/ श्री. सुर्वे माणगांव पोलीस ठाणे हे करीत आहेत.

सदरची कारवाई मा.पोलीस अधीक्षक सो.श्री. अनिल पारस्कर यांचे आधिपत्याखाली मा. अप्पर पोलीस अधीक्षक श्री. सचिन गुंजाळ, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. षषिकिरण काषीद यांचे मार्गदर्षनाखाली प्रत्यक्ष कारवाई पोलीस निरीक्षक श्री. आर.एम.परदेषी नेमणूक नियंत्रण कक्ष, अतिरिक्त कार्य.पोलीस उप अधीक्षक (गृह) पोलीस अधीक्षक कार्यालय रायगड – अलिबाग, राखीव पोलीस उपनिरीक्षक श्री.षेख, पोह/१७५६ आर.व्ही.चाळके, पोह/२११४ आर.जी.मारकंडे यांनी पार पाडले आहे.

महिलेची फसवणूक

निदर्शनास आले.

त्यामुळे दुसऱ्या दिवशी त्यांनी बँकेत धाव घेतली असता, त्यांच्या बचत खात्यातुन सुद्धा ८ हजार रुपयांची रक्कम काढण्यात आल्याचे त्यांना समजले. त्यानंतर अज्ञात टोळीने त्यांच्या एअरटेल सिम कार्डचे क्लोन करुन त्यांच्या बँकेचा पासवर्ड बदलून त्याद्वारे त्यांच्या खात्यातून १ लाख ४६ हजार रुपयांची रक्कम काढून घेतल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यानंतर त्यांनी खारघर पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली होती. त्यानंतर पोलिसांनी प्राथमिक तपास करुन शनिवारी या प्रकरणात गुन्हा दाखल केला आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

कानसळ गावाजवळ तरुणाचा मृतदेह आढळला!

शवविच्छेदन करण्यास जांभुळपाडा वैद्यकीय अधिकाऱ्यांची टाळाटाळ ; अखेर ९ तासांनंतर झाले शविच्छेद

दै.रायगड नगरी । गौसखान पठाण

सुधागड/पाली : पाली, ता. २ (वार्ताहर) सुधागड तालुक्यातील कानसळ येथील दिपक लक्ष्मण पवार (वय ३१) या तरुणाचा मृतदेह येथील पडीक शेताच्या बांधाच्या कडेला साठलेल्या पाण्यात जवळ मंगळवारी (ता.१) आढळला होता. या मृतदेहाचे शविच्छेद करण्यास जांभुळपाडा प्राथमिक आरोग्यकेंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. स्मिताराणी खिल्लारे यांनी नकार दिला. त्यामुळे तिथे काही काळ तणाव निर्माण झाला होता. अखेर ९ तासांनंतर तालुका वैद्यकीय अधिकाऱ्यांनी शविच्छेद केले.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार मयत दिपक लक्ष्मण पवार वय वर्ष ३१ मुळ राहणार राबगाव आदिवासीवाडी ता.सुधागड सध्या राहणार कानसळ आदीवासीवाडी ता. सुधागड हा तरुण सोमवारी (ता.३१) संध्याकाळी चार वाजता कानसळ आदीवासीवाडी येथून घरात कोणास काही न सांगता निघून गेला होता. मंगळवारी (ता.१) सकाळी ७:३० वाजण्याच्या सुमारास कानसळ आदीवासीवाडीच्या दक्षिणेस भुईशेत नावाच्या पडीक शेत जमिनीच्या बांधाच्यामध्ये साठलेल्या

पाण्याजवळ हा तरुण मृत अवस्थेत आढळून आला. त्यानंतर पाली पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बाळा कुंभार, सहाय्यक पोलीस निरीक्षक ए. एस. साबळे, सहाय्यक फौजदार एफ.बी.तडवी, एम.एम. लांगी हवालदार एस.एस.खेडेकर व कांदे हे घटनास्थळी दाखल झाले. घटनास्थळाची पाहणी करून मृतदेह शवविच्छेदनासाठी सकाळी ९ वाजता जांभुळपाडा प्राथमिक आरोग्य केंद्र येथे पाठवण्यात आले. मात्र प्राथमिक अरोग्य केंद्रात डॉ. स्मिताराणी खिल्लारे यांनी शवविच्छेदन करण्यासाठी नकार दिल्याने मयत दिपक लक्ष्मण पवार यांचा मृतदेह ९ तास प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये पडून होता. पोलिस प्रशासनासह नातेवाईकांनी डॉक्टर खिल्लारे यांना विनंती केली. मात्र तरीही शवविच्छेदन करण्यास त्यांनी नकार देऊन तुम्ही मुंबई येथे जे.जे. किंवा के.इ.एम. येथे मृतदेह घेऊन जा असे डॉ. खिल्लारे यांनी सांगितले. याबाबत तालुका आरोग्य अधिकारी डॉ. शशिकांत मढवी यांना नातेवाइकांकडून माहिती देण्यात आली होती.

त्यानंतर डॉ. मढवी प्राथमिक आरोग्य केंद्र जांभुळपाडा येथे जाऊन त्यांनी स्वतः मृतदेहाचे शवविच्छेदन केले. याबाबत पाली पोलीस स्थानकात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक ए. एस. साबळे करीत आहेत.

पागोटे ग्रामपंचायत हद्दीत 'फुलपाखरांची बाग'चा शुभारंभ

दै.रायगड नगरी । उरण

उरण तालुक्यातील पागोटे या गावी तेथील ग्रामपंचायतीच्या सहकार्याने तालुक्यातील तरूणांनी ' फुलपाखरांची बाग 'निर्माण करण्याचा एक अनोखा आणि स्तुत्य उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमाचा शुभारंभ रविवार दि३० रोजी पागोटे ग्रामपंचायत कार्यालयाच्या प्रशस्त आणि पर्यावरणाला पोषक अशा निसर्गरम्य मैदानात फुलपाखरांना आकर्षित करण्याऱ्या फूलझाडांचे रोपण करून संपन्न झाला.

'बहर ' या निसर्गप्रेमी संघटनेच्या वैभव पाटील, हरिश पाटील, अनूज पाटील, अंगराज म्हात्रे, सुरेंद्र पाटील, दौलत पाटील, आदी तरूण पर्यावरणप्रेमी तरूणांच्या संकल्पनेतून ही बाग उभारण्यात येत आहे. या संघटनेतील वैभव पाटील हा कार्यकर्ता (मो.९९२०९६०२३०)फुलपाखरांच्या विविध प्रकारांचा अभ्यासक आहे. आतापर्यंतच्या संशोधनात त्यांनी उरण-पनवेल विभागात ६७ प्रकारच्या विविध फुलपाखयांची नोंद केलेली आहे.

विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे ' सी बर्ड ' नावाची पक्षांचा अभ्यास आणि नोंद करणारी एक प्रमुख संस्था आहे. पागोटे गावचे वैभव पाटील हे सदरहू संस्थेच्या वेबसाईटवर फुलपाखरे/पक्षी यांची नोंद करणारे रायगड जिल्ह्यातील एक क्रमांकाचे अभ्यासक आहेत. पागोटे येथील फुलपाखरांच्या बागेत लवकरच फुलपाखरांची गर्दी होऊन ते नागरिकांचे विशेषतः लहान मुलांचे आकर्षणाचे केंद्र बनेल असा विश्वास या तरूणांनी व्यक्त केला.

या फुलपाखरांची बाग निर्माण करण्याच्या कार्यात पागोटे ग्रामपंचायतीचे सरपंच भार्गव पाटील यांचे मोलाचे सहकार्य लाभत आहे याचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख 'बहर' संघटनेच्या तरूणांनी केला.तसेच सामाजिक कार्यकर्ते सुधाकर पाटील, संतोष पवार यांनी या कार्यक्रमाचे औचित्य साधून वैभव पाटील व उपस्थित कार्यकर्त्यांचे कौतुक केले.

या प्रसंगी बोलताना सरपंच भार्गव पाटील यांनी अशा प्रकारची बाग आमच्या ग्रामपंचायतीच्या प्रांगणात निर्माण होत आहे, याचा आम्हाला अभिमान असून ग्रामपंचायत आणि ग्रामस्थांचे या कामी पूर्ण सहकार्य असेल असा विश्वास व्यक्त केला. सदरहू कार्यक्रमास अनेक पर्यावरणप्रेमी उपस्थित होते. हे सर्व तरूण उरण सामाजिक संस्थेचे कार्यकर्ते संस्थेचे पदाधिकारीही या कार्यक्रमास उपस्थित होते.

केंद्र सरकारकडून पब्जीवर बंदी ; पालकांमध्ये आनंदाचे वातावरण

दै.रायगड नगरी । दिपक घोसाळकर

कळंबोली : लहान मुलांपासून ते तरुण मुलांपर्यंत या पब्जी गेम ने घेरले गेले होते. मुला मधला असलेला आत्मिक आनंद हिरावून घेतला गेला जात होता. या पब्जी गेम मुळे अनेक मुलांचे बळी गेले होते .चार ते पाच तास पब्जी गेम हा बहुतांशी घरांमधून खेळला जायचा. त्यामुळे घरातील कुटुंबाचे वातावरणही बिघडलेले होते. हा गेम कायमचा बंद करावा या मागणीसाठी पालकांमधून मोठ्या प्रमाणावर ओरड होत होती. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आज या पब्जी गेमवर कायमची बंदी घातल्याने पालकवर्गात कडून त्याचे स्वागत करून या निर्णयाबद्दल देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदींना धन्यवाद दिले जात आहेत.

मोबाईल मध्ये नवीन नवीन क्रांती झाल्यानंतर लहान वयापासून अगदी वयस्कर माणसांच्या हातामध्ये मोबाईल सारख्या अत्याधुनिक यंत्र कायमचे खेळू लागले अन् सर्वच आनंद त्या मोबाईल भोवती फिरू लागला .इंटरनेटचं जाळं जस जसे पसरू लागलं तसे या मोबाईल मध्ये विविध एपच्या च्या माध्यमातून लहान मुलांपासून ते वयस्कर मुलांपर्यंत विविध गेम चा वापर सर्रास केला गेला. या मध्ये पब्जी सारखा घातक गेम मुलांच्या हाताला लागल्यामुळे त्यामुळे निर्माण झालेलं विदारक पण कडू सत्य जसे पालकांच्या नजरेसमोर येऊ लागले तेव्हा पासून पब्जी गेम कायमचा बंद व्हावा अशी ओरड पालक वर्ग मधून केली जात होती. चार ते पाच तासा पर्यंत बहुतांशी घरांमधून मुळे या पब्जी गेम च्या अवतीभोवती गुंतलेली दिसून येत होती .आपल्या स्वतःच्या व आयुष्याच्या करियर कडे पाहण्याचा दृष्टिकोनही मुलांमधला बदलून गेलेला होता. अभ्यासामध्ये त्यांचे मन बहुतांशी लागत नव्हते .पब्जी सारखे गेम रात्र रात्र जागून तरुनाही पब्जी गेम मुळे वैफल्यग्रस्त होण्याकडे जाऊ लागली पब्जी गेम मुळे काही कुटुंबांमधील आनंदही हिरावून गेल्यासारखे झाले होते. या गेम मधील असलेला थरार हा मुले प्रत्यक्षात उतरवता दिसत होती .त्यामुळे मुलांमधील समंजसपणा कमी होऊन आक्रस्ताळेपणा अधिकच वाढल्याने पालकांमध्ये ही चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते. तरुण पिढी या पब्जी गेम च्या नादाला लागल्यामुळे त्यांचे पुढे काय होणार या विवंचनेने मध्ये पालक वर्ग पुरता बुडाला होता. सदर चा गेम घातक असून त्याचे दूरगामी परिणाम हे विद्यार्थ्यांच्या आयुष्याशी व जीवाशी खेळणारे असल्यामुळे हा पब्जी गेम कायमचा या देशातून व इंटरनेटच्या जाळ्यातून हद्दपार करण्याची मागणी पालक वर्गात म्हणून जोर धरू लागली होती. या पब्जी गेम मुळे काही कुटुंबात मधून मुले आक्रमक होऊन काही वेळा मोबाईल हिरावून घेतल्यानंतर पालकां वरच आक्रमण करण्यापर्यंत तरुण मुलांनी मजल मारली होती . त्यामुळे पब्जी गेम च्या गर्तेत अडकल्याने मुलांचे भविष्याबाबत पालक वर्गांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते. कधी हा गेम बंद होणार अशा विवंचनेत असताना देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी पब्जी गेम भारतातूनच हद्दपार केल्याचे व त्याच्यावर कायमचे बंदी घातल्याचे जाहीर करताच पालक वर्गा मधून आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून या निर्णयाचे स्वागत केले आहे पब्जी गेम मोबाईल मधूनच कायमचा हद्दपार केल्यामुळे देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदींना पालक वर्गाकडून धन्यवाद दिले जात आहेत.

पशूंसाठी रोगप्रतिबंधक लसीकरणाचे पशुधन विभागाकडून पशु पालकांना आवाहन

दै.रायगड नगरी । अमित गायकवाड

पाली / वाघोशी : दि.१ सप्टेंबर २०२० पासून केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय पशुरोग नियंत्रण कार्यक्रम अंतर्गत लाळ्या खुरकूत रोग नियंत्रण करिता लसीकरण करणे ची पहिली फेरी आज सुरू झाली आहे.

सदर फेरीच्या अनुषंगाने सुधागड-पाली तालुक्यातील पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी १ जांभुळपाडा कार्यक्षेत्रातील टिपूदेवी देवीचंदजी संघवी गोशाळा येथे आज एकूण १६५ गाय वर्ग/म्हैस वर्ग जनावरांना लसीकरण करण्यात आले. लसीकरणापूर्वी सर्व जनावरांच्या कानात १२ आकडी बिल्ले टोचण्यात आले. सदर जनावरांची नोंद केंद्र सरकारच्या inaph या संकेतस्थळ वर करण्यात आली आहे.

पाली तालुक्यातील सर्व पशुपालकांनी आपल्या जवळच्या दवाखान्यात संपर्क साधून सहा महिन्यांच्या वरील सर्व गाय/म्हैस वर्ग यांचे लाळ्या खुरकूत या रोगप्रतिबंधक लसीचे लसीकरण करून घ्यावे तसेच जनावरांच्या कानात बिल्ले मारून घेण्यासाठी सहकार्य करावे असे आवाहन पशुसंवर्धन विभाग पंचायत समिती सुधागड-पाली यांनी यावेळी केले. सदर लसीकरण च्या वेळी डॉ.प्रशांत कोकरे, पशुधन विकास अधिकारी (गट अ), प.वै.द श्रेणी १ जांभुळपाडा, श्री.मोहन मोकल पशुधन पर्यवेक्षक, प.वै.द श्रेणी २ वाघोशी, श्री.सुनील कदम परिचर, श्री.विलास जाधव परिचर उपस्थित होते.

श्रीवर्धन तालुक्यातील बोर्लीपंचतन येथील 'बोर्लीच्या राजा' च्या विसर्जनाला गणेश भक्तांच्या आनंदाची उधळण पाहायला मिळाली. विसर्जन प्रसंगी अंतिम दर्शन घेताना अनेकांना डोळे भरून आले. (छाया : गणेश प्रभाळे, दिघी)

Mr.Mujawar so.

Adv.Trupti B. Mahangade

PUBLIC NOTICE

IN THE COURT OF CIVIL JUDGE (S.D.) PANVEL AT PANVEL

M.A.No.301/2020
Exh No.7/D
Next Date : 05/10/2020

1) Shri.Satish Ramchandra Koli
Age-57 yrs. Occp : Service
R/at :- Madhavrao Rokade Marg
B/I.T Chawl No.1 Room No.102,
Mandavi Koliwada, Mumbai
2) Dr.Latika Krishna Shivkar
Age-59 yrs., Occp : Doctor
R/at : Municipal Block no.4/4,
Sion Koliwada, Mumbai
3) Mrs.Savita Suresh Tambe
Age-61 yrs. Occp : Housewife
R/at : Adarash Janseva Mandal,
Akurli Road, Kandivali (E) Mumbai Applicants

WHEREAS the above named Applicants have filed the application for Heirship Certificate of deceased Late Shailaja Ramchandra Koli. died on 19/07/2018 at Room no.127, Cement Chawl, Third floor, M.R. street, Masjid (w), Mumbai, in respect of property mentioned herein under in schedule standing in the name of Deceased's Husband namely Ramchandra Damodar Koli as co-sharer/holder with others.

WHEREAS if any person has any Objections. Titles, Claims, Share etc. in the property herein under mentioned they they may appear in person or through their Advocates, objecting this application. If no one appears and objects for the same within 30 days from the date of this notice then this Hon'bale Court will proceed to pass the necessary order thereon.

SCHEDULE OF PROPERTY

Agricultural land bearing its Survey No.437, hissa no.241 adm. about 0-99-2 Unit Case No.87 situated at Roadpali Ambetarkhar. Panvel, valued at Rs.3,381/-

Given under my hand and seal of this Court on this 02 day of 09-2020.

Sign/-
jr.Cleark
Civil Court, Panvel

Court Seal

Sign/-
Assistant Superintend
Civil Court, Panvel

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे : कोन, ता.पनवेल, जि.रायगड येथील मुळ मालक/भोगवटाधारक श्री.गोपीनाथ राघो म्हात्रे राहणार मौजे : कोन, ता.पनवेल, जि.रायगड यांचे मालकीची, ताबेकब्जातील, वहिवाटीतील तसेच त्यांचे नावे साताबारा सदरी नोंद असलेली खालील वर्णनाची जिरायत व पोट खराब जमीन आमचे अशिलांनी त्यांच्याकडून कायम स्वरुपात विकत घेण्याच्या विचारात आहेत. सबब सदरहू मिळकतीचे कोणतेही नोंदणीकृत दस्त करण्यापूर्वी सदर मिळकतीमधील मुळ मालक/भोगवटा धारकांचे असलेले मालकी हक्क तपासण्याकरिता आमचे अशिलांचे वतीने सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहेत.

मिळकतीचे वर्णन

मौजे : कोन, ता.पनवेल, जि.रायगड

अ. क्र.	भूधारणा पद्धती	सर्व्हे नं.	हिस्सा नं	क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी.	आकार रु.पै.
१	२	१४	३	०-१३-९० पो.ख.०-०१-३०	२.८१

तरी वर नमूद जमिनीवर/मिळकतीवर वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांच्या आत आपला हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासहीत खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून नमूद मिळकतीबाबतचा जमीन मालक श्री.गोपीनाथ राघो म्हात्रे यांचे मालकी हक्क हे निर्वेध व बोजारहीत असल्याबाबत गृहीत धरुन त्याप्रमाणे सदरहू मिळकती आमचे अशिल त्यांचे नावे नोंदणीकृत खरेदीखताद्वारे कायमस्वरुपी हस्तांतरीत करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे हे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत, असे गृहीत धरले जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ०२/०९/२०२०

सही/-
श्री.समाधान आबासाहेब काशिद
वकील उच्च न्यायालय
ऑफिस नं.६, तळमजला, श्री.बालाजी कृपा सोसायटी, भूखंड क्र.२८, सेक्टर नं.२२, कामोठे, नवी मुंबई-४१०२०९
मो.नं.९०९६३९९०२०

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे : वाजे, ता.पनवेल, जि.रायगड येथील महसूल दप्तरी खालील वर्णनाची शेतजमीन मिळकत आमचे अशिलांनी श्री.चंद्रकांत बाळाराम पाटील, रा.वाजे, ता.पनवेल, जि.रायगड यांचेकडून कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे : वाजे, ता.पनवेल, जि.रायगड

सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्रफळ हे.आर.पॉ.	आकार रु.पै.
१५८	१	०-६४-२० पो.ख.०-१५-५० एकूण ०-७९-७० एकूण क्षेत्रापैकी ०-१६-०० इतके क्षेत्राबाबत	०.९८

वरील वर्णनाच्या जमिनी मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेच्या साठेकरार विक्री, गहाण, दान, लिज, बक्षिसपत्र, चार्ज, फरोक्त, दावा, वारसाहक्क, लायसन्सी, लिन, टेनन्सी, विल, अन्नवस्त्र, पोटगी, ताबा कब्जा, हवाला, अदला बदल व येणे जाणेसाठी अथवा वहिवाटी वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्याचे खरेदीखताच्या व्यवहारास हरकत असल्यास संबंधित व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह लेखी स्वरुपात पोस्टाने किंवा स्वतःहून हजर होवून आमचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसात कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचा अशिलांच्या लाभांत सोडून दिला असून त्याची आमच्या अशिलांच्या लाभांत होणाऱ्या खरेदीखतास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यास येवून खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर मागाहून कोणत्याही प्रकारची हरकत घेतल्यास ती हरकत आमच्यावर अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

दि.०२/०९/२०२०
स्थळ : पनवेल

सही/-
ॲड.प्रदीप श.म्हात्रे
ॲडव्होकेट्स ॲड लिगल कन्सल्टंटस्
बी/१०४, पहिला मजला, पायोनिअर को.ऑप.हौ.सोसायटी, स्वामी नित्यानंद मार्ग, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड

जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील नमूद केलेली मिळकत ही श्रीमती.बेबीबाई गंगाराम पाटील रा.आंबे तर्फे तळोजे, ता.पनवेल, जि.रायगड यांचे नावे आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे : आंबे तर्फे तळोजे, ता.पनवेल, जि.रायगड

मालक/कब्जेदाराचे नांव	सर्व्हे नंबर	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार रु.पै.
श्रीमती.बेबीबाई गंगाराम पाटील	४/१/अ	०-३९-२० यापैकी विक्री क्षेत्र ०-२०-० हे.आर.	६.९४

मौजे : आंबे तर्फे तळोजे, ता.पनवेल येथील वर नमूद मिळकत जमीन मालक श्रीमती.बेबीबाई गंगाराम पाटील रा.आंबे तर्फे तळोजे, ता.पनवेल, जि.रायगड यांचेकडून आमचे अशिल श्री.धनाजी परशुराम कोंडीलकर रा.कुडावे, ता.पनवेल, जि.रायगड यांनी कायमस्वरुपी नोंदणीकृत खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे.

सदर नमूद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा कब्जा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांचे हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसाच्या आत प्रत्यक्ष येवून अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवावेत. याप्रमाणे मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल वर नमूद केलेले जमीन मालक/कब्जेदार यांचे बरोबर ठरविलेला कायम खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाही याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १/९/२०२०

सही/-
मयुरेश प्र.हनुमंते
ॲडव्होकेट-हायकोर्ट
शॉप नं.९, पवन अपार्टमेंट, नवीन कोर्टाचे जवळ, लोखंडीपाडा, ता.पनवेल, जि.रायगड
मो.नं.८२८६१२१३३३

लॉकडाऊनमध्ये माथेरानचे पर्यटन सुरू करण्याबाबत स्थानिकांमध्ये द्विधा मन:स्थिती?

दै.रायगड नगरी । मुकूंद रांजाणे

माथेरान : माथेरान मधील सर्व नागरिकांसह छोट्या मोठ्या स्टॉल्स धारक, दुकानदार, लॉजिंग, हॉटेल्स इंडस्ट्री, मोलमजुरी करणारे श्रमिक त्याचप्रमाणे कुली, हातरीक्षा चालक, घोडेवाले यांचे पुर्णतः जीवनमान हे पर्यटनावर अवलंबून असते. परंतु कोरोना सारखे महाभयंकर संकट कोसळल्याने इथे १८ मार्च पासून पुर्णतः लॉक डाऊन करून कोरोनाचा प्रादुर्भाव होऊ नये यासाठी पर्यटकांना बंदी घालण्यात आली आहे. या लॉक डाऊनला पाच महिन्यांचा कालावधी उलटून गेला आहे परंतु आजतागायत जनजीवन सुरळीत होऊ शकलेले नाही.

आजवर माथेरान मध्ये कोरोना रुग्णांचे शून्य प्रमाण होते.सर्वांनी उत्तम प्रकारे काळजी घेतली होती परंतु नुकताच काही दिवसांपूर्वी गावातील एका भागात जवळजवळ चौदा व अन्य ठिकाणी दोन असे एकूण सोळा कोरोना पोजीटीव्ह रुग्ण आढळून आल्याने तसेच दि.१ सप्टेंबर रोजी व्यापारी वर्गाची कोरोना तपासणी केली असता यामध्ये चार आणखीन रुग्ण आढळून आले आहेत त्यामुळे हा आकडा पुढे पुढे वाढत आहेत त्यामुळे गावात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अगदी कमी लोकसंख्या असलेल्या या गावात कोरोनाचा शिरकाव जलदगतीने होण्याची शक्यता नाकारता येत नाही कारण सर्व नागरिक हे नेहमीच काहींना काही कारणास्तव एकमेकांच्या संपर्कात येत असतात त्यामुळे संपूर्ण गावातील नागरिकांची तपासणी केल्यास मोठया प्रमाणावर रुग्ण आढळून येण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. ही साखळी तोडण्यासाठी,नागरिकांनी आपली आणि आपल्या कुटुंबाची काळजी घेण्याबाबत वारंवार प्रशासनाच्या माध्यमातून विद्यमान नगराध्यक्षा प्रेरणा सावंत सूचना आणि सोशल मीडियावर माहिती देत आहेत

याबाबतीत वेळोवेळी मार्गदर्शन करीत आहेत. परंतु इथे सुध्दा आता कोरोनाने आपले पाय घट्ट रोवण्यास सुरुवात केलेली दिसत आहे.त्यामुळे नागरिक भयभीत झालेले पहावयास मिळत आहेत. या लॉक डाऊनच्या पाच महिन्याच्या महाभयंकर काळात नागरिकांना कुठल्याही जीवनावश्यक वस्तूंच्या बाबतीत कमतरता भासू नये यासाठी आजवरच्या कार्यकाळात मुंबई, पुण्यातील अनेक सेवाभावी संस्था,दानशूर व्यक्तींनी, काही राजकीय मंडळींनी सुध्दा मदतीचा हातभार लावून नागरिकांना उदरनिर्वाहासाठी मुबलक प्रमाणात साहित्याचे वाटप केलेले आहे.त्यामुळे नागरिक निर्धास्तपणे आपले जीवन जगत आहेत.इथल्या अश्वपालकांना आपल्या अश्वांच्या खाद्यासाठी विविध ठिकाणांहून भूशाचे वाटप सुध्दा दानशूर लोकांनी,विविध संस्थेच्या माध्यमातून मोठया प्रमाणावर करण्यात आलेले आहे.

मागील तीन दशकांपूर्वी इथले सर्व व्यवहार हे पावसाळ्यात पुर्णतः बंद असायचे.घोडे चार महिने पावसाळ्यात आपापल्या तबेल्यातच आराम करीत असत. तेव्हा घोडे सुध्दा गुटगुटीत राहत होते परंतु या कोरोनाच्या लॉक डाऊन मधील कार्यकाळात की काय घोडे एकाच जागेवर तबेल्यात बांधले जात असल्याने आजारी पडत असल्याबाबतीत काही अश्वपालकांकडून विविध प्रसार माध्यमाकडे दिलेल्या मुलाखती मधून तक्रारी ऐकावयास मिळत आहेत. गावातील सर्वच नागरिकांना व्यवसायाचे साधन उपलब्ध व्हावे जेणेकरून अन्य व्यवहार पूर्ण करण्यासाठी प्रत्येकाच्या हातात आर्थिक सुबत्ता येऊ शकते.या सर्वांगीण चांगल्या उद्देशानेच काही मंडळे, संस्था, आणि काही पक्षाची राजकीय मंडळी माथेरानचे पर्यटन सुरू करावे यासाठी आग्रही भूमिका घेत आहेत. पाच महिन्यांच्या लॉक डाऊन नंतर पर्यटकांना प्रवेश देण्यात आला तर आणखीन रुग्ण वाढू शकतात. मुंबई पुण्यापासून अगदी जवळचे पर्यटनस्थळ असल्याने मोठया प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सर्वांनाच आपापले व्यवसाय मनात भीती ठेऊनच करावे लागणार आहेत त्यातूनही इथल्या सर्वसामान्य लोकांच्या उदरनिर्वाहाच्या दृष्टीकोनातून इथे पर्यटन सुरू व्हावे ही भूमिका जरी व्यावसायिकांच्या हिताच्या बाबतीत सकारात्मक आणि योग्य असली तरीसुद्धा या लहानशा गावात कोरोना रुग्ण वाढत गेल्यास त्यासाठी प्रशासनाला खूपच त्रासदायक ठरू शकते. सर्वसामान्य लोकांना पुढील अवाजवी वैद्यकीय खर्च हे न परवडणारे आहेत.त्यामुळे इकडे आड आणि तिकडे विहीर अशीच द्विधा मन:स्थिती इथल्या स्थानिकांची झाली आहे.

देशात लॉकडाऊन घेण्याचा उद्देश हा कोरोनाला हद्दपार करणे हा होता. मार्चमधे दररोज पाच दहा बाधीत मिळायचे तोच आकडा सहा महीन्यांच्या लॉकडाऊनतरही पंच्याहत्तर हजारांवर पोहोचलाय. जागतीक आरोग्य संघटनेच म्हणन आहे की कोरोनाची आपत्ती आणखी दोन वर्षे राहणार आहे. यामुळे व्यवसायावर बंदी आणुन काहीही साध्य होणार नाही. अचानक सुट्ट्यांमधे आपण व्यवसाय सुरु केला तर धांदल उडेल. एवढ्या मोठ्या प्रमाणात पर्यटक येतील तेव्हा या आपत्तीकाळात त्यांच्याशी कसा व्यवहार करायचा याचा सराव झालेला नसेल, तर अक्षरश: गोंधळ उडेल.

त्यामुळे माथेरान पर्यटकांसाठी आता सुरु केले तर कमी प्रमाणात पर्यटक येतील. विविध नियम, संकेत पाळणे सोपे जाईल व या नविन पद्धतीने वागण्याचा सराव होईल. ज्या गोष्टींची काळजी घ्यायचीय त्यांची सवय होईल. त्यामुळे शासनाने आता हॉटेल व लॉज सुरु करण्यास परवानगी दिली आहे. ई पास रद्द केला आहे. त्यामुळे आपल्याला आता कोणतेही वेगळे निर्बंध लादता येणार नाहीत हे केंद्र सरकारने चार दिवसांपुर्वीच स्पष्ट सांगीतल आहे. दुकाने सुरु करण्यास अगोदरच परवानगी दिलेली आहे. घोडे, रिक्षा, कुली, स्टॉल्स,हॉटेल, इत्यादी व्यवसाय सुरु होतील. सर्वांचे उत्पन्न सुरु होईल. ते फार आवश्यक आहे.

> नागरीकांनी स्वतःच्या आरोग्याची जबाबदारी घ्यावी. सर्वांनी सार्वजनीक ठिकाणी मास्क लावुन तोंड व नाक झाकुन घ्यावे. सॅनिटाईझरची छोटी बाटली खिशात ठेवावी व ठराविक कालावधीनंतर हात सॅनिटाईज करावेत. साबणाने हात धुवावेत. दररोज सकाळ संध्याकाळ मिठाच्या गरम पाण्याने गुळण्या कराव्यात व नाकात पाच मिनिटे वाफ घ्यावी. सकस ताजा आहार घ्यावा. विटामिन सी, डी व झींकच्या गोळ्या डॉक्टरांच्या सल्ल्याने घ्याव्यात. या व इतर मार्गदर्शक सुचना आरोग्यविभाग वेळोवेळी देत असते त्यांचे काटेकोर पालन करु यात व पुनश्च व्यवसायासही सुरुवात करु यात.
>
> **मनोज खेडकर, माजी नगराध्यक्ष तथा राष्ट्रीय काँग्रेस शहर अध्यक्ष माथेरान**

> १८ मार्चला माथेरान लॉक डाऊन होहून सहा महिने झाले हातांवर कमवणाऱ्या लोकांचे खूप हाल झाले आहेत पर्यटनांवर अवलुबन असणारे माथेरान आता पर्यटकांचे वाट पाहत आहे शेवटी जगणं हे कोरोना संगतीच आहे प्रत्येकानी आपआपली काळजी घ्यावी.आणि व्यवसाय सुरू केले पाहिजेत.
>
> **राकेश कोकळे, अध्यक्ष धनगर समाज माथेरान**

> राज्य सरकारने ई पास रद्द केला आहे व हॉटेल्स व लॉजेस ना सुरू करण्यास परवानगी दिली असल्याने माथेरानचे पर्यटन योग्य ती काळजी घेत सुरू झाले पाहिजे अनलॉक ची प्रक्रिया सुरू झाल्यापासून खेडे गावापासून मुंबई पुणे शहरातील व्यवसाय टप्याटप्याने सुरू झाले आहेत कोरोना सोबत जगायचे ठरवल्याने व्यवसाय देखील सुरू करावे लागतील .
>
> **सुनिल शिंदे, सामाजिक कार्यकर्ते माथेरान**

> जिल्हाधिकारी यांनी मार्च महिन्यात लॉक डाऊन करण्याबाबत आदेश दिले होते त्यानुसार आजपर्यंत माथेरान लॉक डाऊन आहे. माथेरान मधील नागरिकांना व्यवसाय उपलब्ध व्हावा यासाठी लवकरच माथेरान पर्यटकांसाठी खुले करावे याबाबत नगराध्यक्षा प्रेरणा सावंत यांनी वरिष्ठांना ६ जुलै रोजी निवेदन सादर केले आहे. नागरिकांनी स्वतःची काळजी घेतली तर पर्यटकांना प्रवेश देण्यास हरकत नाही. १०ते१५ सप्टेंबरमध्ये माथेरान सुरू करण्याचा आमचा मानस आहे. जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार लवकरच नागरिकांना उत्पन्नाचे साधन प्राप्त होण्यासाठी इथे पर्यटकांना प्रवेश देण्यासाठी आम्ही आग्रही असून त्याच प्रयत्नात आहोत.
>
> **प्रसाद सावंत, गटनेते माथेरान नगरपरिषद**

माणगाव मधील मोर्बा रोड बनतोय माणगावकरांचा पार्किंग झोन

दै.रायगड नगरी । माणगाव

दिघी – पुणे रस्ता माणगाव बाजार पेठेतून गेला असल्यामुळे कित्येक मोर्बा रोड वरिल दुकानदारांवर बेरोजगारीची वेळ आली. मात्र ह्या दिघी–पुणे रोडचे काम माणगाव बाजारपेठेतून पूर्ण करण्यात आले असल्याने रोड मोठा झाल्याचे चित्र दीसत आहे. या रोड चे काम पूर्ण झाले असल्याने या रोड वर होणारी वाहतुक कोंडी टाळता येईल असे चित्र निर्माण झाले होते. मात्र सध्या हा रोड माणगावकरांच पार्किंग झोन झालेला दिसत आहे.

गेल्या वर्षी या रोड वरिल असणारे आतिक्रमण माणगाव नगरपंचायतने पोलीस प्रशासनाची मदत घेऊन हटविले होते. शासनाच्या या धोरणामुळे छोट्या–मोठ्या व्यावसायिकांनी नाराजी व्यक्त केली होती.

माणगांव वरून श्रीवर्धन, हरिहरेश्वर, दिवेआगर ही प्रेक्षणीय स्थळे जवळ असल्याने या स्थळाकडे जाणारा मुख्य मार्ग म्हणजे मोर्बा रोड. त्यामुळे माणगांव शहरात वाहतूक कोंडीची मोठी समस्या निर्माण होत होती. साप्ताहिक सुट्टी शनिवार – रविवारी तर मोठी वाहतूक कोंडी होत असे. आणि त्यात दिघी पोर्टकडून पोस्कॉ कंपनीकडे जाणारे मोठ – मोठे अवजड ट्रेलर त्यामुळे मोठा त्रास माणगांवकराना बरेच वर्ष सहन करावा लागत होता. त्याचे मुख्य कारण म्हणजे माणगांवकडून श्रीवर्धनकडे जाणारे अवजड वाहने. त्यांना होत असणारी मोर्बा रोडवरील व्यावसायिकांमुळे वाहतुकीची कोंडी.

तसेच हा रोड मोठा झाला मात्र सध्या मोर्बा रोडवर अतिक्रमणे सुद्धा पुन्हा चालू झालेली दिसत आहेत. बाजारपेठेत येणारी लोक मोर्बा रोडला बेशिस्तपणे गाडी पार्क करून जातात. त्यामुळे वाहतुकीची कोंडी मोठ्या प्रमाणावर होत आहे. उपजिल्हा रुग्णालय ही मोर्बा रोडला असल्याने तिथे ये जा करणाऱ्या रूग्णांना देखील वाहतूक कोंडीचा त्रास सहन करावा लागत आहे. मोर्बा रोडवरील गटाराचे काम अर्धवट स्थितीत असल्यामुळे सांडपाणी रोडवर येते. त्यामुळे नागरिकांना त्याच सांडपाण्याच्या घाणीतून नाकाला रुमाल बांधून जावे लागत आहे. त्यात मोर्बा रोडवर होणारी अतिक्रमणे, बेजबाबदारपणे होत असलेली पार्किंग यांच्यावर स्थानिक प्रशासनाने योग्य ती कारवाई करून नागरिकांच्या समस्या सोडवाव्यात अशी मागणी जनतेतून होत आहे.

म्हसळामध्ये अनंत चतुर्दशीच्या बाप्पांना भावपूर्ण निरोप

दै.रायगड नगरी । म्हसळा

दहा दिवस मनोभावे सेवा केल्यानंतर अनंत चतुर्दशीच्या बाप्पाना निरोप देण्यात आला. मंगळवार दुपार नंतर गणपती विसर्जनाला सुरवात झाली. देशावर व राज्यात कोरोना सारख्या महाभंयकर रोगाचे सावट आसताना शासनाने नीर्गमीत केलेल्या अटी व शर्तीचे पालन करत कोणतेही वाद्य, मिरवणूक तसेच गुलालाची उधळण न करता विसर्जन करण्यात आले. भजन न करता विसर्जन करणे ही पहिलीच वेळ होती.म्हसळा मध्ये घरगुती गणपतींची संख्या भरपूर प्रमाणात असते. शेवटची मंगल आरती आटोपून बप्पाला साश्रू नयनांनी निरोप देण्यात आला.विसर्जन सोहळा निर्विंध्न पार पाडण्यासाठी रस्ते व विसर्जन घाटावर पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. सर्व शहर वासीयांकडून घरगुती गणरायाला गोड पदार्थांचा नैवदय असलेली शिदोरी बांधुन बापासोबत बरोबर विसर्जन करण्यात आले.

मोबाईल दुकान फोडून १६ लाखांचे ऐवज आणि साडे चार लाखाहून अधिक रोख रक्कम घेवून पसार

दै.रायगड नगरी । पनवेल

खारघर सेक्टर ७ मधील शिव इलेक्ट्रॉनिक्स दुकानाचे गॅस कटरच्या साहाय्याने दरवाजा तोडून घरफोडया करणाऱ्या चोरटयानी जवळपास २१ लाख रुपये किंमतीचे ऐवज चोरट्यांनी घेवून फरार झाल्याची घटना घडली असून या प्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

खारघर सेक्टर–७ मधील एआरएम आर्केड या इमारतीत शिव इलेक्ट्रॉनिक्स नावाचे मोबाईल, लॅपटॉप व एक्सेसरीजचे दुकान आहे. या दुकानात मोबाईल दुरुस्तीचे देखील काम केले जाते. रमेशकुमार याने आपले दुकान बंद केल्यानंतर तो व इतर कामगार आपापल्या घरी निघुन गेले. मात्र पहाटेच्या सुमारास अज्ञात चोरटयानी शिव सेंटर या दुकानाचा लोखंडी ग्रीलचा कोयंडा तसेच लोखंडी ग्रील मागे असलेले दुकानाचे शटर गॅस कटरने कापून दुकानात प्रवेश केला.

त्यानंतर दुकानातील ऍपल कंपनीचे एक लाख रुपये किंमतीचे ४ मोबाईल फोन, पाऊण लाख रुपये किंमतीचे ओपो कंपनीचे ७ मोबाईल फोन, ३३ हजार रुपये किंमतीचे विवो कंपनीचे ३ मोबाईल फोन, १० लाख ७ हजार रुपये किंमतीचे सॅमसंग कंपनीचे ५० मोबाईल फोन, लिनोवो कंपनीचे सुमारे १ लाख रुपये किंमतीचे १० मोबाईल फोन, २ लाख १६ हजार रुपये किंमतीचे एमआय कंपनीचे १७ मोबईल फोन चोरले. त्याशिवाय चोरटयानी दुरुस्तीला आलेले ५० हजार रुपये किंमतीचे २७ वेगवेगळ्या कंपन्याचे जुने फोन आणि दुकानाच्या कॅश काऊंटरवर ठेवण्यात आलेली ४ लाख ८४ हजाराची रक्कम असा जवळपास २१ लाखांचे ऐवज लुटून चोरटे पसार झाले. विशेष म्हणजे आपली ओळख पटू नये यासाठी सदर चोरटयानी दुकानात लावण्यात आलेल्या सीसीटीव्हीचा डीव्हीआर सुद्धा चोरुन नेला आहे.

दरम्यान दुध विक्रेत्याला दुकानाचे शटर कापण्यात आल्याचे निदर्शनास आल्यानंतर त्याने दुकानमालक मालक रमेशकुमार याला याबाबत माहिती दिली. त्यानंतर रमेशकुमारने दुकानावर धाव घेऊन पहाणी केली असता, चोरटयानी संपुर्ण दुकान साफ केल्याचे त्याच्या निदर्शनास आले. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यानंतर पोलिसांनी अज्ञात चोरटयावर घरफोडीचा गुन्हा दाखल करुन त्यांचा शोध सुरु केला आहे.

२० लाख ७२ हजार रुपये किंमतीचा ऐवज चोरुन संपुर्ण दुकानच साफ केल्याचे उघडकिस आले आहे. खारघर पोलिसांनी या गुह्यातील आरोपींचा शोध घेण्यास सुरुवात केली असली तरी, या घरफोडीच्या घटनेनंतर इतर दुकानदारांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

युवकाची गळफास लावून आत्महत्या

दै.रायगड नगरी । उरण

तालुक्यातील अंबिकावाडी–नागाव येथील बेकारीमुळे वैफल्यग्रस्त झालेल्या एका २५ वर्षीय युवकाने घराच्या मजल्यावरील खोलीत गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. समीर घरत असे या युवकांचे नाव आहे. उरण पोलिस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या अंबिकावाडी – नागाव येथे समीर आपल्या आई–वडिलांसह राहात होता.

नोकरीच्या शोधानंतरही त्याला नोकरी मिळाली नाही. बेकारीमुळे समीर वैफल्यग्रस्त झाला होता. काल रात्रीचे जेवण करुन झोपण्यासाठी समीर वरच्या मजल्यावर गेला होता. सोमवारी सकाळी वडील उठवण्यासाठी वरच्या मजल्यावर गेले असता खोलीचा दरवाजा आतून बंद असल्याचे आढळून आले. दरवाजा ठोठावुनही आतुन कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. यामुळे वडिलांनी खिडकीच्या काचा तोडल्या असता त्यांना समीरचा मृतदेह खोलीच्या छताखाली गळफास घेतलेल्या स्थीतीत दिसून आला. नैराश्यातुन त्यांनी आत्महत्या केली असल्याचा प्राथामिक अंदाज तपास अधिकारी सपोनि आर.आर. पठाण यांनी व्यक्त केला आहे. याप्रकरणी उरण पोलिस अधिक तपास करीत आहेत.

सेवानिवृत्त फौजी समीर दुंदरेकर यांचे विचुंबे गावात उत्साहात स्वागत

दै.रायगड नगरी । पनवेल

पनवेल तालुक्यातील विचुंबे गावचे सुपुत्र समीर दुंदरेकर हे १६ वर्षांनी भारतीय सैन्यदलातून देशसेवा करून निवृत्त झाले,त्यांचे आज गावात उत्साहात स्वागत झाले,त्यानिमित्ताने ग्रामस्थांच्यावतीने फौजी दुंदरेकर यांचा स्वागत सोहळा आयोजित करण्यात आला होता.

यावेळी झालेल्या स्वागत सोहळ्यात क्रांतिकारी सेवा संघाचे अध्यक्ष नामदेव फडके यांच्या हस्ते समीर दुंदरेकर यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी माजी सरपंच संजय म्हात्रे, विठू गोवारी, नंदकुमार भगत, रवी भोईर, पुरुषोत्तम भोईर, रवी म्हात्रे, सुनील तुपे, मिलिंद पोपटा, ज्येष्ठ पत्रकार गणेश कोळी, सचिन दुंदरेकर आदी उपस्थित होते. या सोहळ्यात समीर दुंदरेकर यांच्या सर्व कुटुंबीयांतर्फे केक कापून स्वागत करण्यात आले.

यावेळी सत्काराला उत्तर देताना, मी देशसेवा करताना मला माझ्या गावाचा आणि कुटुंबीयांचे सहकार्य लाभले. माझी देशसेवा जरी सुखरूप झाली असली तरी, काही प्रसंगांना मला सामोरे जावे लागले.आज युवा पिढीमध्ये देशाभिमान वृद्धिंगत होण्याची गरज आहे असे दुंदरेकर यांनी सांगितले.

यावेळी माजी सरपंच संजय म्हात्रे यांनी, दुंदरेकर हे आमच्या गावचे एकमेव सैनिक असल्याचा आम्हाला अभिमान आहे, त्यांनी आमच्या गावचे नाव उज्वल केले आहे. या प्रसंगी समाजसेवक विठू गोवारी,माजी उपसरपंच पुरुषोत्तम भोईर यांनी मनोगत व्यक्त केले. या स्वागत सोहळ्याप्रसंगी देशभक्तीपर गीताने सारे वातावरण चैतन्यमय झाले होते. या समारंभात दुंदरेकर यांचे भाऊ सचिन दुंदरेकर यांनी पनवेल महानगरपालिकेत कोरोना काळात चांगल्या प्रकारे सेवा बजावली असल्याचे त्यांचा कोरोना योद्धा म्हणून सत्कार करण्यात आला. या समारंभाचे सूत्रसंचालन प्रविण मोहोकर यांनी केले.